"मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेंतर्गत e-KYC करण्याची संधी उपलब्ध करुन देण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**

**महिला व बाल विकास विभाग.**

**शासन परिपत्रक क्रमांक- मबावि २०२५/प्र.क्र.२३९/कार्या-२,**

नवीन प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- ०६ फेब्रुवारी, २०२६.

**संदर्भ:-**

१) महिला व बाल विकास विभाग, शासन परिपत्रक क्र. मबावि २०२५/प्र.क्र.१५३/कार्या-२, दि.१८.०९.२०२५, दि.१८.११.२०२५ व दि.११.१२.२०२५.
२) महिला व बाल विकास विभाग, शासन पत्र क्र.मबावि २०२५/प्र.क्र.२३९/का.०२, दि.२०.०१.२०२६.

**प्रस्तावना :-**

"मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांनी e-KYC माध्यमातून दि.३१.१२.२०२५ पर्यंत Aadhaar Authentication व्दारे e-KYC प्रक्रिया पूर्ण केली आहे. परंतु सदर प्रक्रिया पूर्ण करताना लाभार्थी महिलांकडून "लाभार्थ्याच्या कुटुंबातील सदस्य नियमित/कायम कर्मचारी/कंत्राटी कर्मचारी म्हणून सरकारी विभाग/उपक्रम/मंडळ/भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत नसावा किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहे किंवा कसे" याबाबत पर्याय निवडताना चुकीचा पर्याय निवडला गेल्या असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे योजनेतील निकषाच्या अनुषंगाने सदर लाभार्थी महिलांची सखोल तपासणी करुन लाभार्थ्यांच्या पात्रता/अपात्रतेची प्रत्यक्ष पडताळणी (Physical Verification) करण्याबाबत सर्व संबंधित जिल्हाधिकारी यांना शासन पत्र दि.२०.०१.२०२६ अन्वये कळविण्यात आले होते.

तथापि, सदर लाभार्थ्याची जलदगतीने पडताळणी करण्याकरिता ऑनलाईन e-KYC मध्ये पुन्हा एकदा सुधारणा करण्याची संधी देण्यात यावी, अशी मागणी योजनेच्या लाभार्थ्यांकडून व क्षेत्रिय कार्यालयाकडून होत आहे. त्यानुषंगाने ऑनलाईन e-KYC मध्ये पुन्हा एकदा सुधारणा करण्याची संधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन परिपत्रक :-**

"मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेंतर्गत दि.३१.१२.२०२५ पर्यंत ज्या लाभार्थी महिलांनी e-KYC प्रक्रिया पूर्ण केली आहे. तथापि, सदर प्रक्रिया पूर्ण करताना "लाभार्थ्याच्या कुटुंबातील सदस्य नियमित/कायम कर्मचारी/कंत्राटी कर्मचारी म्हणून सरकारी विभाग/उपक्रम/मंडळ/भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत नसावा किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहे किंवा कसे" याबाबतचा पर्याय निवडताना नजरचुकीने चुकीचा पर्याय निवडण्यात आलेला आहे. अशा लाभार्थी महिलांसाठीच ऑनलाईन e-KYC मध्ये पुन्हा एकदा सुधारणा करण्याची संधी दि.३१.०३.२०२६ पर्यंत उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२. उपरोक्त अनुषंगाने योजनेच्या पोर्टलवर सुधारणा करण्यात आली आहे. यापुढे कोणत्याही परिस्थितीत सुधारणा करण्याची संधी उपलब्ध करुन दिली जाणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०२०६१२१२२३१३३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRASAD VINAYAKRAO KULKARNI

Digitally signed by PRASAD VINAYAKRAO KULKARNI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=83b8be9eb843dd6eccbd6aa4f9eecd0b5f7aca67ff32b2eef7b9ed2d85ab9442, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7D19730DDF785210D50C28934B75E9B7B4F5D06B6181CF1901CE3E48EC9E3985, cn=PRASAD VINAYAKRAO KULKARNI
Date: 2026.02.06 12:31:45 +05'30'

**(प्र.वि. कुलकर्णी)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष/सदस्य, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई,
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई,
६. मा.मंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. मा.राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
९. मा.मुख्य सचिव, मंत्रालय मुंबई,
१०.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
११.सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२.विभागीय आयुक्त (सर्व),
१३.आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे,
१४.जिल्हाधिकारी (सर्व),
१५.महालेखापाल - महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर,
१६.महालेखापाल - महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर,
१७.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१९.सह सचिव, उपसचिव, अवर सचिव महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
२०.सर्व सह आयुक्त/उप आयुक्त / विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे,
२१.सर्व विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास (आयुक्तालय पुणे मार्फत),
२२.सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (आयुक्तालय पुणे मार्फत),
२३.महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई (सर्व कार्यासने),
२४.निवड नस्ती, कार्यासन-२.